# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/ 53 दिनांक : 11/01/2024

**परिपत्रक** -03

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थी महाविद्यालयामार्फत/ऑनलाईन पध्दतीने गुणपडताळणी (Verification), गुणपडताळणीतील चूक (Counting Mistake), उत्तरपत्रिकेतील काही भाग तपासवयाचे राहून गेला असेल (Not Assess) व पूनर्मूल्यांकन (Revaluation) या चार वेगवेगळया पध्दतीकरीता विद्यापीठाकडे अर्ज करतात.

सर्व अभ्यासक्रमातील सर्व विषयांचे *(बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या वगळून) निकाल संगणक प्रणालीद्वारे पूर्णपणे गोपनिय पध्दतीने ऑनलाईन प्रसिध्द केले जात असल्याने ऑक्टो/नोव्हें-२०२३ पासून गुणपडताळणी (Verification), गुणपडताळणीतील चूक (Counting Mistake), याबाबत यापुढे कोणतीही कार्यवाही विद्यापीठामार्फत केली जाणार नाही. उत्तरपत्रिकेतील काही भाग तपासवयाचे राहून गेला असेल (Not Assess) करीता विद्यापीठ मुदतीत अर्ज सादर करावा.

त्यामुळे या हंगामापासून फक्त पूनर्मूल्यांकनाबाबतच (Revaluation) विद्यापीठामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**पूर्नमूल्यांकन : १) विद्यार्थ्यांनी ज्या विषयांची छायांकित प्रत घेतली असेल त्याच विषयासाठी पूनर्मूल्यांकन अर्ज ज्या विषयाकरीता ऑनलाईन सुविधा देण्यात आली आहे त्याकरीता ऑनलाईन अर्ज सादर करावा व ज्या विषयाकरीता *ऑफलाईन सुविधा देण्यात आली आहे त्याकरीता ऑफलाईन अर्ज प्राचार्यामार्फत सादर करावा. २) अर्जासोबत गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडावी. पूनर्मूल्यांकनासाठी एका विषयास रु.५००/- शुल्क आकारण्यात येते.**

उपरोक्त बाब सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व परीक्षेशी संबंधित सर्व घटकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

* परिपत्रक क्र.८२, दि.११-१२-२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयाने कार्यवाही करताना या परिपत्रकातील वरील तीन बाबीवर आपल्या महाविद्यालयामार्फत कोणतीही कार्यवाही करुन नये.

(डॉ.एम.एस.रोकडे)
**प्र-संचालक**